भारतीय रिज़र्व बैंक
RESERVE BANK OF INDIA
www.rbi.org.in

**आरबीआय/२०१२-१३/१७**
**डीएनबीएस (पीडी-एमजीसी) सी.सी. क्र. १२/ २३.११.००१/२०१२-१३** **जुलै २, २०१२**

सर्व मॉडगेज गॅरंटी कंपन्यांचे अध्यक्ष/सीईओ

महोदय,

**३० जून २०१२ पर्यंत दुरुस्ती केलेली अधिकृत सूचना गहाणासाठी हमीदार कंपन्यांचे प्रुडेंशियल नॉर्म्स (रिझर्व्ह बँक) निर्देश, २००८**

आपणस माहितच आहे की, ह्या विषयावरील सर्व विद्यमान सूचना एकाच ठिकाणी मिळाव्यात ह्यासाठी रिझर्व बँक अद्यावत केलेली परिपत्रके/अधिसूचना देत असते. जून ३०, २०१२ रोजी अद्यावत केलेल्या अधिसूचना क्र. डीएनबीएस (एमजीसी) ४/सीजीएम(पीके) -२००८ दि फेब्रुवारी १५, २००८ मधील सूचना खाली दिल्या आहेत. ही अद्यावत केलेली अधिसूचना आरबीआयच्या वेबसाईटवरही http://www.rbi.org.in टाकण्यात आली आहे.

आपली,

**(उमा सुब्रमणियम)**
प्रभारी मुख्य महाव्यवस्थापक

**रिझर्व बँक ऑफ इंडिया**
**अबँकीय पर्यवेक्षणचे विभाग खाते**
**केंद्रीय कार्यालय**
**सेंटर १, वर्ल्ड ट्रेड सेंटर,**
**कफ परेड, कुलाबा**
**मुंबई- ४०० ००५**

**अधिसूचना डीएनबीएस(पीडी)एमजीसी क्र.४ /सीजीएम (पीके) - २००८ दिनांक फेब्रुवारी १५, २००८**

सार्वजनिक हिताच्या दृष्टीने आणि देशाच्या फायद्यासाठी कर्ज-प्रणालीचे विनियमन करण्यास ह्या बँकेला सहाय्य करण्यासाठी आवश्यक वाटल्याने, व खाली दिलेल्या प्रुडेंशियल नॉर्म्ससंबंधाने निदेश देणे आवश्यक वाटल्याने, भारतीय रिझर्व बँक, भारतीय रिझर्व बँक अधिनियम, १९३४ (१९३४ चा २) च्या कलम ४५ जेए ने दिलेल्या, तसेच ह्याबाबत तिला सहाय्यभूत असलेल्या सर्व अधिकारांचा वापर करुन, प्रत्येक मॉडगेज गॅरंटी कंपनीला येथे विहित केलेले निदेश देत आहे.

**<u>लघु शिर्षक, सुरुवात व ह्या निदेशांचे लागु होणे</u>**

**१.** (i) ह्या निदेशांना 'मॉडगेज गॅरंटी कंपन्या प्रुडेंशियल नॉर्म्स (रिझर्व बँक) निदेश, २००८' असे समजले जाईल.

(ii) हे निदेश ताबडतोब जारी होतील आणि रिझर्व बँकेद्वारे केलेल्या मॉडगेज गॅरंटी कंपन्यांच्या पंजीकरण योजनेखाली पंजीकरण प्रमाणपत्र दिल्या गेलेल्या प्रत्येक मॉडगेज गॅरंटी कंपनीला लागु होतील.

**<u>व्याख्या</u>**

**२.** (१) ह्या निदेशांच्या हेतुसाठी अन्यथा संदर्भ नसल्यास ;

(i) 'शंकास्पद ॲसेट' म्हणजे, १२ महिन्यांपेक्षा अधिक काळपर्यंत एक सब-स्टॅंडर्ड ॲसेट म्हणून राहिलेला ॲसेट;

(ii) हायब्रिड डेट भांडवली संलेख' म्हणजे, इक्विटी तसेच कर्ज ह्यांचे काही विशिष्ट गुणाविशेष असलेला भांडवली संलेख;

(iii) 'लॉस ॲसेट' म्हणजे,

(अ) मॉडगेज गॅरंटी कंपनीने किंवा तिच्या अतर्गत किंवा बाह्य ऑडिटरने किंवा रिझर्व बँकेने लॉस ॲसेट ठरविलेला व त्या मॉडगेज गॅरंटी कंपनीने राईट ऑफ न केलेला असा एक ॲसेट; आणि

(ब) सिक्युरिटीच्या मूल्यातील ऱ्हास किंवा सिक्युरिटीची उपलब्धता नसणे किंवा फसवणुकीची कृती किंवा कर्जदाराने वगळल्यामुळे वसुली न होण्याचा धोका ह्यामुळे बाधित झालेला ॲसेट.

(iv) 'मॉडगेज गॅरंटी कंपनी' म्हणजे, मॉडगेज गॅरंटी कंपन्या (रिझर्व बँक) मार्गदर्शक तत्वे, २००८ च्या परिच्छेद २(१)(१) मध्ये व्याख्या केलेली कंपनी.

(v) (I) ह्या निदेशांच्या संदर्भात 'निव्वळ निज निधी' म्हणजेः

(अ) त्या कंपनीच्या अगदी अलिकडील ताळेबंदातून पुढील गोष्टी वजा करुन राहिलेले एकूण भरणा झालेले इक्विटी भांडवल व मुक्त राखीव निधी-

(i) संचयित बॅलन्स ऑफ लॉस;
(ii) डिफर्ड रेव्हेन्यु एक्सपेंडिचर; आणि
(iii) इतर अमूर्त ॲसेट्स; आणि

(ब) ह्यामधून रकमा वजा केल्या जाव्यात-

(१) अशा कंपनीच्या पुढील प्रकारच्या गुंतवणुकी-

(i) तिच्या दुय्यम कंपन्यामधील;
(ii) तिच्या गटातील कंपन्यामधील;
(iii) इतर सर्व अबँकीय कंपन्यांमधील

(२) डिबेंचर्स, बॉंड्स, थकित कर्जे आणि दिलेल्या अग्रिम राशी (हायर परचेस व लीज फायनान्स धरुन) आणि खाली प्रमाणे ठेवी-

(i) अशा कंपनीच्या दुय्यम कंपन्यात
(ii) त्याच गटातील कंपन्यात.

मात्र अशी रक्कम वरील (अ) च्या १० % पेक्षा अधिक असावी.

(II) ''दुय्यम संस्था' आणि 'त्याच गटातील कंपन्या' ह्यांचे अर्थ, कंपनीज अधिनियम १९५६ (१९५६ चा १).मध्ये दिलेल्या अर्थानुसारच असेल.

(vi) मॉडगेज गॅरंटी ॲसेटच्या बाबतीत 'अकार्यकारी ॲसेट' (एनपीए) म्हणजे, ट्रिगर इव्हेंट झाल्यानंतर कर्ज संस्थेकडून मिळविलेला ॲसेट. ह्याला सरळसरळ अकार्यकारी ॲसेट असे वर्गीकृत केले जाते व त्यापुढील त्याचे वर्गीकरण एनपीएच्या वयानुसार केले जाईल.

(vii) 'निजनिधी : म्हणजे, गाईड लाईन्स ऑन रजिस्ट्रेशन अँड ऑपरेशन्स ऑफ मॉडगेज गॅरंटी कंपनीच्या परिच्छेद १८ नुसार ठेवलेल्या आकस्मिक राखीव निधी, शेअर प्रिमियम खात्यातील शिल्लक, त्या ॲसेटच्या विक्रीतून मिळालेली अतिरिक्त रक्कम, (वजा त्या ॲसेटच्या पुनर्मूल्यांकनामुळे निर्माण झालेला राखीव निधी, वजा संचायित लॉस बॅलन्स, अमूर्त ॲसेट्सचे पुस्तकीमूल्य व असल्यास डिफर्ड रेव्हेन्युखर्च) ह्यासह मुक्त राखीव निधी न भरणा झालेले इक्विटी भांडवल;

(viii) 'स्टॅंडर्ड ॲसेट' म्हणजे, ज्याच्या बाबतीत मुद्दल किंवा व्याज ह्यांच्या परतफेडीमध्ये कोणतीही कसुरी दिसून येत नाही व ज्यात कोणतीही अडचण दिसत नसून त्यात व्यवसायातील सामान्य जोखमी पेक्षा अधिक जोखीम दिसून येत नाही असा ॲसेट.

(ix) 'मॉडगेज गॅरंटी ॲसेटच्या बाबतीत सबस्टॅंडर्ड ॲसेट' म्हणजे, १२ महिन्यांपेक्षा अधिक नसलेल्या काळासाठी अकार्यकारी ॲसेट म्हणून वर्गीकृत केलेला ॲसेट.

(x) 'सबॉर्डिनेटेड कर्ज' म्हणजे, पूर्णपणे प्रदान केलेला, अप्रतिभूतित आणि इतर धनकोंचा हक्क असलेला तसेच निर्बंधक खंडांपासून मुक्त असलेला आणि मॉडगेज गॅरंटी कंपनीच्या पर्यवेक्षण प्राधिकरणाच्या संतीशिवाय, धारकाने विमोचन करता न येण्यासारख्या एक संलेख. अशा संलेखाचे पुस्तकी मूल्य खाली दिल्यानुसार डिस्काउंट करता येतेः

| संलेखांची उर्वरित परिपक्वता | डिस्काउंटचा दर |
|---|---|
| (अ) एक वर्षापर्यंत | १००% |
| (ब) एक वर्षापेक्षा अधिक परंतु दोन वर्षांपर्यंत | ८०% |
| (क) दोन वर्षापेक्षा अधिक परंतु तीन वर्षांपर्यंत | ६०% |
| (ड) तीन वर्षापेक्षा अधिक परंतु चार वर्षांपर्यंत | ४०% |
| (ई) चार वर्षापेक्षा अधिक परंतु पाच वर्षांपर्यंत | २०% |

मात्र असे डिस्काउंटेड मूल्य टियर १ भांडवलाच्या ५०% पेक्षा अधिक असू नये;

(xi) सबस्टँशियल इंटरेस्ट' म्हणजे, एखादी व्यक्ती किंवा तिचा पती/पत्नी किंवा अल्पवयीन मूल ह्यांनी, वैय्यक्तिक रितीने किंवा एकत्रितपणे, एखाद्या कंपनीच्या शेअर्समध्ये लाभार्थी हितसंबंध ठेवणे. त्यावरील भरणा केलेली रक्कम त्या कंपनीच्या भरणा भांडवलाच्या किंवा भागीदारी कंपनीच्या सर्व भागीदारांनी दिलेल्या भांडवलाच्या १० % पेक्षा अधिक नाही;

(xii) 'टियर १ भांडवल' म्हणजे, निजनिधी वजा, इतर अबँकीय वित्तीय कंपन्यामधील शेअर्समध्ये, आणि शेअर्स, डिबेंचर्स, बॉंड्स, थकित कर्जे व अग्रिम राशी तसेच दिलेले लीज फायनान्स व दुय्यम कंपन्या व त्याच गटातील कंपन्या ह्यामधील निजनिधीच्या दहा टक्क्यांपेक्षा अधिक रकमेची गुंतवणुक.

सूचना- दुय्यम कंपन्या, त्याच गटातील कंपन्या आणि इतर एनबीएफसी ह्यांच्या शेअर्समधील गुंतवणुकीचा संबंध, त्या मॉडगेज गॅरंटी कंपनीने कर्ज फेडीसाठी मिळविलेल्यांशी आहे.;

(xiii) 'टियर २ भांडवलात' पुढील बाबी समाविष्ट आहेः-

(अ) प्रिफरन्स शेअर्स;
(ब) पंचावन्न टक्क्यांच्या दराने डिस्काउंट केलेले पूनर्मूल्यांकित राखीव निधी;
(क) सर्वसाधारण तरतुदी व तोट्याबाबतचे राखीव निधी मात्र असे निधी, प्रत्यक्ष मूल्य ऱ्हास किंवा कोणत्याही विशिष्ट ॲसेटमधील समजून येण्याजोगा भावी तोटा ह्यांच्याशी संबंधित नसावा आणि ते निधी, जोखीम भारित ॲसेट्सच्या सव्वा टक्का एवढा अनपेक्षित तोटा व स्टँडर्ड ॲसेट्स वरील तरतुदी भागविण्यासाठी उपलब्ध असावा;
(ड) हायब्रिड डेट कॅपिटल संलेख; आणि
(ई) सबॉर्डिनेटेड कर्ज,

मात्र ह्यांची एकूण टियर १ भांडवलापेक्षा अधिक असू नये;

(xiv) 'उलाढाल व व्यवसायिक उलाढाल'म्हणजे, त्या वर्षामध्ये केलेले एकूण मॉडगेज करार आणि त्या वर्षात केलेल्या इतर कार्यकृतींमधून निर्माण झालेला व्यापार ;

(२) ह्यामध्ये वापरण्यात आलेल्या परंतु व्याख्या न केलेल्या व रिझर्व बँक ऑफ इंडिया अधिनियम,१९३४ (१९३४ चा २) किंवा मॉडगेज गॅरंटी कंपन्या (रिझर्व बँक) मार्गदर्शक तत्वे, २००८ मध्ये (अधिसूचना डीएनबीएस (पीडी)एमजीसी) क्र. ३/ सीजीएम (पीके) २००८ दि. फेब्रुवारी १५, २००८ मध्ये दिलेल्या) व्याख्या केलेल्या शब्दांचा व शब्दसमूहांचा अर्थ त्या अधिनियमात किंवा निदेशात त्यांना दिल्यानुसारच असेल. हा अधिनियम किंवा ते निदेश ह्यात

व्याख्या न केलेल्या शब्दांचा व शब्दसमूहांचा अर्थ, कंपनीज अधिनियम १९५६ (१९५६ चा १) मध्ये त्यांना दिलेल्या अर्थाप्रमाणेच असेल.

**उत्पन्नाची ओळख**

**३.** (i) एखाद्या एनपीओ असलेल्या ॲसेटवरील किंवा एनपीए असून, एखादा ट्रिगर प्रसंग घडल्यावर धनको संस्थेकडून ताबा घेतल्या गेलेल्या एनपीएवरील व्याज/डिस्काउंटसह कोणतेही इतर आकार केवळ रोख धर्तीवरच ओळखले जातील.
(ii) गहाणासाठी हमीदार कंपनी, भारतीय सनदी लेखापालांच्या संस्थेने जारी केलेल्या जमाखर्चाच्या मानकांनुसार गहाणाच्या हमीच्या करारपत्रांवर अधिमूल्य किंवा शुल्क आकारेल, जे नफा तोट्याच्या हिशोबामध्ये उत्पन्न म्हणून दाखविले जाईल. न मिळालेल्या अधिमूल्याच्या रकमेची ताळेबंदामध्ये दायित्वाच्या बाजूला वेगळ्या ओळीमध्ये नोंद केली जाईल.
(iii) गहाणासाठी हमीदार कंपनीने हाती घेतलेल्या कोणत्याही इतर व्यवसायासंबंधी, भारतीय रिझर्व्ह बँक कायदा, १९३४ च्या कलम ४५I(सी) मध्ये नमूद केल्याप्रमाणे वैध मर्यादेमध्ये नॉन-बँकिंग फिनानशियल (नॉन-डिपॉझिट ॲक्सेप्टिंग ऑर होल्डिंग) कंपन्यांचे प्रुडेंशियल नॉर्म्स (रिझर्व बँक) निर्देश, २००७ मध्ये समाविष्ट केल्याप्रमाणे अशा ॲसेटस्साठी नमूद केलेल्या उत्पन्नाला मान्यता देणा-या नॉर्म्सच्या आधारे, उत्पन्नाला मान्यता दिली जाईल.

**जमाखर्चाची मानके**

**४.** भारतीय सनदी लेखापालांच्या संस्थेने जारी केलेली जमाखर्चाची मानके आणि मार्गदर्शक सूचना (या निर्देशांमध्ये आयसीएआयय असा उल्लेख आहे) जोवर ह्या निर्देशांच्या कोणत्याही तरतूदींशी विसंगत नाहीत, तोवर त्यांचे पालन केले जाईल.

**ॲसेटसचे वर्गीकरण**

**५.** (१) योग्य प्रकारे निश्चित केलेल्या उधारीतील उणीवांचे प्रमाण आणि वसूलीसाठी संपार्श्विक प्रतिभूतिवरील अवलंबनाची व्याप्ती लक्षात घेतल्यानंतर, गहाणासाठी प्रत्येक हमीदार कंपनी, त्याचे ॲसेटस्, कर्जे आणि आगाऊ रकमा आणि कोणत्याही इतर स्वरूपातील उधारी यांचे खालील प्रकारात वर्गीकरण करेलः

(i) प्रमाणित ॲसेटस्*;
(ii) अनुप्रमाणित ॲसेटस्;
(iii) अनिश्चित ॲसेटस्; आणि
(iv) तोट्यातील ॲसेटस्.

* हमीच्या बंधनांखाली मिळविलेल्या ॲसेट्सचे प्रमाणित ॲसेट्समध्ये वर्गीकरण होणार नाही.

(२) वर उल्लेख केलेल्या ॲसेट्सच्या वर्गीकरणामध्ये, केवळ नवीन अनुसूची तयार केल्याचा परिणाम म्हणून बदल केला जाणार नाही, तर त्यासाठी आवश्यक असलेल्या, बँकेने वेळोवेळी निर्धारित केलेल्या अटींचीं पूर्तता करणे गरजेचे आहे.

**तरतूदीसाठी आवश्यक बाबी**

**६. (१) भंग झालेल्या हमींवरील तोट्यांसाठी तरतूद** : जेव्हा गहाणासाठी हमीदार कंपनीच्या हमीचा भंग होतो तेव्हा

त्या कंपनीला संभाव्य तोटा होतो. ॲसेट्सच्या प्रलंबित वसूलीच्या अशा भंग पावलेल्या हमींच्या संबंधातील तोट्यासाठी गहाणासाठी हमीदार कंपन्या तरतूदी करतील. तरतूदीसाठी धारण करण्याची आवश्यकता असलेली रक्कम, जेथे हमीचा भंग झाला आहे त्यासंबंधातील प्रत्येक घराच्या कर्जासाठी कंपनीने धारण केलेल्या ॲसेटस्च्या वसूल होऊ शकणा-या किमतीचे अनुयोजन केल्यानंतर कराराप्रमाणे भंग झालेल्या रकमेच्या एकूण रकमेएवढी असेल. जर कोणत्याही भंग झालेल्या हमीच्या संबंधातील धारण केलेल्या ॲसेटस्ची वसूल होऊ शकणारी किंमत भंग झालेल्या रकमेपेक्षा जास्त असेल तर अतिरिक्त रक्कमेचे दुस-या भंग झालेल्या हमीतील तुटीच्या अनुषंगाने अनुयोजन होणार नाही. जर आधीच धारण केलेली तरतूदीची रक्कम वर गणना केलेल्या रकमेपेक्षा जास्त असेल तर अतिरिक्त रकमेचे व्युत्क्रमण होणार नाही. प्रतिवर्षी केलेल्या तरतूदीच्या रकमेची नफा तोट्याच्या खात्यामध्ये वेगळ्या ओळीमध्ये नोंद केली जाईल. भंग झालेल्या हमींच्या हिशोबपूर्तीमधील तोट्यांसाठी धारण केलेली तरतूदीची रक्कम ताळेबंदामध्ये दायित्वाच्या बाजूला वेगळ्या ओळीमध्ये दर्शविली जाईल.

**(२) झालेल्या परंतु नोंद न केलेल्या (आयबीएनआर) तोट्यांसाठी तरतूद** : जेव्हा गहाणासाठी हमीदार कंपनीने हमी दिलेल्या घराच्या कर्जामध्ये कमतरता असते तेव्हा कंपनीला संभाव्य तोटा होतो. अशा परतफेड न केलेल्या घराच्या कर्जाच्या संबंधात जेथे महत्वाची घटना नंतर घडणार असते किंवा अजूनही हमीचा भंग झालेला नसतो, त्यावेळी गहाणासाठी हमीदार कंपन्या तरतूदी धारण करतील. हमीदार कंपनीचा जो संभाव्य तोटा होतो त्याला, झालेला परंतु नोंद न केलेला (आयबीएनआर) तोटा असे म्हणतात. धारण करण्याची आवश्यकता असलेली तरतूदीची रक्कम विम्याच्या आधारे, झालेल्या परंतु नोंद न केलेल्या तोट्याची पुनरावृत्ती आणि त्याची तीव्रता यांच्या अंदाजांवर आधारित काढली जाईल, जी परतफेड केलेले दावे, हिशोबपूर्ती झालेल्या दाव्यांसाठी धारण केलेली तरतूद, धोक्यांची आकडेवारी इ. यांच्या संदर्भातील भूतकाळातील माहिती, नवीन कल, आर्थिक घटक आणि इतर संख्याशास्त्रीय माहिती यांच्या आधारे मिळते. जर आधीच धारण केलेली तरतूदीची रक्कम वर गणना केलेल्या रकमेपेक्षा जास्त असेल तर अतिरिक्त रकमेचे व्युत्क्रमण होणार नाही. प्रतिवर्षी केलेल्या तरतूदीच्या रकमेची नफा तोट्याच्या खात्यामध्ये वेगळ्या ओळीमध्ये नोंद केली जाईल. झालेल्या परंतु नोंद न केलेल्या (आयबीएनआर) तोट्यांसाठी धारण केलेली तरतूदीची रक्कम ताळेबंदामध्ये दायित्वाच्या बाजूला वेगळ्या ओळीमध्ये दर्शविली जाईल.

(३) वर उल्लेख केलेल्या बाबींच्या संबंधाने, गहाणासाठी प्रत्येक हमीदार कंपनी, खाते निष्क्रीय बनण्यातील असलेला वेळेचा फरक, त्याची असलेली मान्यता, रोख्यांची वसूली आणि आकारलेल्या रोख्यांच्या किमतीतील काल परत्वे होणारी घट या बाबी लक्षात घेतल्यानंतर खाली नमूद केल्याप्रमाणे प्रत्येक वर्गासाठी तरतूद करेल :-

(४) **गहाणासाठी हमी असलेले ॲसेटस्**

गहाणासाठी हमी असलेल्या ॲसेटसच्या संबंधातील तरतूदीची आवश्यकता खालीलप्रमाणे असेल:

(i)तोटा झालेले ॲसेटस् — पूर्ण ॲसेटचे निर्लेखन केले जाईल. जर कोणत्याही कारणासाठी ॲसेटस्ची नोंद खाते पुस्तकात राहण्यास परवानगी मिळाली तर न फेडलेल्या रकमेच्या १००% तरतूद केली पाहिजे;

(ii)शंकास्पद ॲसेटस् — (अ) रोख्याच्या वसूल होऊ शकणा-या किमतीतील समावेश न केलेल्या आगाऊ रकमेच्या हिश्श्यापर्यंत १००% तरतूद ज्याचा गहाणासाठी हमीदार कंपनी वैध प्रकारे अवलंब करेल. वसूल होऊ शकणा-या किमतीचा अंदाज वास्तवातील आधारावर केला जाईल;

(ब) सुरक्षित हिश्श्याबाबत, ॲसेट ज्या कालावधीसाठी शंकास्पद राहिला आहे त्या आधारे सुरक्षित हिश्श्याच्या २०% ते १००% पर्यंत खालील आधारे तरतूद केली पाहिजे:

| **ॲसेट शंकास्पद स्थितीत राहिलेला कालावधी** | **% तरतूद** |
|---|---|

| | |
|---|---|
| एक वर्षाच्या कालावधीपर्यंत | २० |
| एक ते तीन वर्षे | ३० |
| तीन वर्षांपेक्षा जास्त | १०० |

(iii) अनुप्रमाणित ॲसेटस्  न फेडलेल्या एकूण रकमेच्या १० टक्के सर्वसाधारण तरतूद केली जाईल.

**प्रमाणित ॲसेटससाठी**

प्रमाणित ॲसेट — गहाणासाठी हमीदार कंपन्यांनी प्रमाणित ॲसेटस्साठी खालील आधारे सर्वसाधारण तरतूद केली पाहिजे;

(अ) २० लाखांपेक्षा जास्त रकमेच्या रहाण्याच्या घरांवरील कर्जासाठी हमीचा समावेश १% दराने;

(ब) इतर सर्व हमीचा समावेश ०.४०% दराने

**टीपः**

(१) निव्वळ एनपीएस् काढण्यासाठी प्रमाणित ॲसेटवरील तरतूद गणली जाणार नाही.

(२) प्रमाणित ॲसेटसाठी केलेली तरतूद एकूण आगाऊ रकमेतून बाजूला काढण्याची आवश्यकता नाही परंतु ती ताळेबंदामध्ये इतर देयके आणि इतर तरतूदी या मथळ्याखाली प्रमाणित ॲसेटसाठी अनुषंगिक तरतूद अशा प्रकारे स्वतंत्रपणे दर्शविली पाहिजे.

(३) हे स्पष्ट केलेले आहे की एनपीएस् वरील उत्पन्नाची मान्यता आणि त्यासाठी केलेली तरतूद या प्रुडेंशियल नॉर्म्सच्या दोन स्वतंत्र बाजू आहेत आणि नॉर्म्सप्रमाणे केलेल्या तरतूदी एनपीएस् च्या न फेडलेल्या एकूण रकमेवर करण्याची आवश्यकता आहे. एनपीए वरील उत्पन्नाला मान्यता मिळालेली नाही ही बाब तरतूद न करण्यासाठी कारण होऊ शकत नाही.

**इतर उपक्रम**

७. गहाणासाठी हमीदार कंपनी त्याच्या एकूण ॲसेटस्च्या १०% पर्यंत कोणताही उपक्रम हाती घेऊ शकते. जर गहाणासाठी हमीदार कंपनीने भारतीय रिझर्व्ह बँक कायदा, १९३४ च्या ४५I(सी) कलमा अंतर्गत नमूद केलेला कोणताही इतर व्यवसाय परवानगी असलेल्या मर्यादेमध्ये चालू केला, ज्यासाठी प्रुडेंशियल नॉर्म्स आधीच विहीत केल्या आहेत आणि ज्यांचा समावेश २२ फेब्रुवारी २००७ च्या अधिसूचना क्रमांक डीएनबीएस. १९३ डीजी(व्हीएल)-२००७ मध्ये आहे, ज्यात वेळोवेळी दुरुस्ती केलेली आहे, त्याच नॉर्म्सचे पालन गुंतवणुकीच्या मूल्यांकनासाठी, ॲसेटच्या वर्गीकरणासाठी आणि तरतूदीसाठी केले पाहिजे.

**लेखांकनाचे वर्ष**

८. गहाणासाठी हमीदार प्रत्येक कंपनी प्रतिवर्षी ३१ मार्चला त्याचा ताळेबंद आणि नफा तोट्याचे खाते तयार करेल. जेव्हा गहाणासाठी हमीदार कंपनीचा, कंपनीच्या कायद्याच्या तरतूदींप्रमाणे त्याच्या ताळेबंदाची तारीख पुढे ढकलण्याचा हेतू असतो तेव्हा त्याने ह्या उद्देशाने कंपन्यांच्या प्रबंधकाला भेटण्यापूर्वी भारतीय रिझर्व बँकेची पूर्व अनुमती घेतली पाहिजे.

याशिवाय, बँक आणि कंपन्यांच्या प्रबंधकाने जरी वाढीव कालावधी देण्याचे मान्य केले तरी गहाणासाठी हमीदार

कंपनी, त्या वर्षाच्या ३१ मार्च रोजीचा (न तपासलेला) आगाऊ पाठविलेला ताळेबंद आणि त्या दिवशी देय असलेले वैधानिक उत्पन्न बँकेला सादर करेल.

**ताळेबंदात उघड करणे**

**९.** (१) गहाणासाठी हमीदार प्रत्येक कंपनी वर उल्लेख केलेल्या परिच्छेद ६ प्रमाणे केलेली तरतूद, उत्पन्नातून किंवा ॲसेटस्च्या मूल्यांकनाच्या अनुषंगाने बाजूला न काढता तिच्या ताळेबंदामध्ये स्वतंत्रपणे उघड करेल.

(२) गहाणासाठी हमी असलेल्या व्यवसायासाठी आणि इतर आणि वैयक्तिकपणे ॲसेटस्च्या प्रत्येक वर्गासाठीच्या तरतूदी स्वतंत्रपणे वेगळ्या मथळ्याच्या खात्याखाली सुस्पष्टपणे खालीलप्रमाणे दर्शविल्या जातीलः-

(i) बुडित आणि शंकास्पद कर्जासाठीच्या तरतूदी; आणि
(ii) गुंतवणूकीतील घसा-यासाठी तरतूद.

(३) प्रतिवर्षासाठी अशा तरतूदी जमा-खर्चाच्या खात्यामधून केल्या जातील.

**गहाणासाठी हमीदार कंपनीद्वारा लेखापरीक्षा समितीची घटना**

**१०.** गहाणासाठी हमीदार प्रत्येक कंपनी एक लेखापरीक्षा समिती घडवेल, ज्यामध्ये त्या कंपनीच्या संचालक मंडळातील तीनपेक्षा कमी अ-कार्यकारी संचालक नसतील, त्यापैकी किमान एक सनदी लेखापाल असेल.

स्पष्टीकरण I: कंपनी कायदा, १९५६ (१९५६ चा १) च्या कलम २९२ए अन्वये आवश्यक असलेली गहाणासाठी हमीदार कंपनीने घडविलेली लेखापरीक्षा समिती ह्या परिच्छेदाच्या उद्देशासाठी लेखापरिक्षा समिती असेल.

स्पष्टीकरण IIः या परिच्छेदाखाली घडविलेल्या लेखापरिक्षा समितीला कंपनी कायदा, १९५६ (१९५६ चा १) च्या कलम २९२ए मध्ये निर्धारित केलेले तेच अधिकार, कार्य आणि जबाबदा-या असतील.

**सरकारी रोख्यातील व्यवहार**

**११.** गहाणासाठी हमीदार प्रत्येक कंपनी सरकारी रोख्यातील व्यवहार तिचे सीएसजीएल खाते किंवा तिचे डिमॅट खाते यांच्या द्वारा करू शकेलः

जर गहाणासाठी हमीदार कोणतीही कंपनी सरकारी रोख्यातील कोणताही व्यवहार कोणत्याही दलालाद्वारा प्रत्यक्ष स्वरुपात करणार नाही.

**भांडवलाच्या पर्याप्ती बाबतची गरज**

**१२.** (१) गहाणासाठी हमीदार प्रत्येक कंपनीला निव्वळ मालकीचा निधी कमीतकमी १०० करोड रुपये किंवा अशी दुसरी रक्कम असण्याच्या अटीची पूर्तता करावी लागेल जी, भारतीय रिझर्व्ह बँक वेळोवेळी निश्चित करू शकेल, भांडवलाचा स्तर I आणि स्तर II चा समावेश असलेले भांडवलाचे कमीतकमी गुणोत्तर राखेल, जे तिच्या ताळेबंदातील धोका असलेल्या एकूण ॲसेट्सच्या आणि ताळेबंदात नसलेल्या घटकांच्या धोका अनुयोजित किमतीच्या दहा टक्क्यांपेक्षा कमी नसेल. आवश्यक असलेल्या भांडवलाच्या गुणोत्तरातील तिच्या धोका असलेल्या एकूण ॲसेट्च्या कमीतकमी ६% कंपनी स्तर I म्हणून राखेल.

(२) कोणत्याही वेळी स्तर II चे एकूण भांडवल स्तर I च्या भांडवलाच्या शंभर टक्क्यांपेक्षा जास्त नसेल.

**स्पष्टीकरणे:**

**ताळेबंदावरील ॲसेट्स**

(१) ह्या निदेशांमध्ये प्रतिशतभार (पर्सेंटेज वेटेज) म्हणून व्यक्त केलेल्या कर्ज जोखमींच्या मात्रा ताळेबंदातील ॲसेट्सना देण्यात आल्या आहेत. ह्यामुळे त्या ॲसेटचे रिस्क ॲडजस्टेड मूल्य मिळविण्यास, प्रत्येक ॲसेट/बाबीच्या मूल्याला संबंधित जोखीम भाराने गुणावयाचे असते. किमान कॅपिटल रेशो घेण्यासाठी एकूण हिशेबात घ्यावी लागते. खाली दिल्यानुसार, निधीयुक्त बाबींची भारित एकूण बेरीज म्हणून जोखीम भारित मूल्यांकित केला जाईलः

| **ॲसेट्सच्या बाबी - ताळेबंदावरील बाबींची जोखीम-** | **भार टक्केवारी** |
|---|---|
| (i) रोकड | ० |
| (ii) बँकेरील शिल्लक व स्थिर ठेवी आणि ठेवी प्रमाणपत्रांसह बँकांवरील दावे | २० |
| (iii) गुंतवणुकी | |
| (अ) केंद्र सरकार व राज्य सरकारच्या प्रतिभूती. | ० |
| (ब) बँकांचे बाँड्स | २० |
| (क) स्थिर ठेवी/ ठेवीचे प्रमाणपत्रे/ सार्वजनिक वित्तसंस्थाचे बाँड्स | १०० |
| (ड) सर्व कंपन्यांचे शेअर्स* आणि सर्व कंपन्यांचे डिबेंचर्स/बाँड्स/कमर्शियल पेपर्स आणि डेट ओरिएंटेड/मनीमार्केट म्युच्युअल फंडांचे युनिट्स. | १०० |

(*मॉडगेज गॅरंटीज् कंपन्या इन्वेस्टमेंट (रिझर्व बँक) निदेश २००८ च्या परिच्छेद ३(ii) अनुसार, कॉर्पोरेट कंपन्यांचे शेअर्स, केवळ कर्ज फेडी नंतरच मिळविता येतात)

| (iv) चालु ॲसेट्स | |
|---|---|
| (अ) कर्जे व अग्रिम राशी | १०० |
| (ब) सुपर ॲन्युईटीज्, लाभ व फ्लॅट्स/घरे ह्यांच्या तारणाविरुध्द कर्मचाऱ्यांना दिलेली कर्जे | २० |
| (क) कर्मचाऱ्यांना दिलेली अन्य कर्जे | १०० |
| (ड) प्रतिभूतित असलेली इतर कर्जे व अग्रिम राशी. | १०० |
| (ई) इतर (नेट स्टॉक ऑन हायर, खरेदी व डिस्काउंट केलेली बिले इत्यादि सहा ) | १०० |

(v) स्थिर ॲसेट्स (घसाऱ्याची निव्वळ)

| | |
|---|---|
| (अ) लीज केलेले ॲसेट्स (निव्वळ पुस्तकी मूल्य) | १०० |
| (ब) जागा | १०० |
| (क) फर्निचर व फिक्सचर्स | १०० |
| (ड) इतर स्थिर ॲसेट्स | १०० |

(vi) इतर ॲसेट्स

| | |
|---|---|
| अ) मूळ स्त्रोतातून कापलेला आयकर (निव्वळ तरतुद) | ० |
| (ब) भरलेला अग्रिम राशी (निव्वळतरतुदी) | ० |
| (क) सरकारी सिक्युरिटीजवर द्यावयाचे व्याज | ० |
| (ड) इतर | १०० |

**टीपः**

(१) घसाऱ्यासाठी तरतुद केली आहे अशा ॲसेट्सबाबत किंवा बुडित किंवा शंकास्पद कर्जासाठी तरतुद केली आहे तेथे नेटिंग केले जाऊ शकते.

(२) निव्वळ निजनिधी काढण्यासाठी, निजनिधीमधून वजा केलेल्या ॲसेट्सना 'शून्य' भार असेल.

(३) एकूण निधीयुक्त जोखीम भार काढण्यासाठी, एखाद्या कर्जदाराचा निधीयुक्त जोखीम काढताना, मॉडगेज गॅरंटी कंपन्या, त्या कर्जदाराच्या एकूण आऊटस्टँडिंग जोखमीमधून दिलेल्या अग्रिम राशींविरुध्द, तारण म्हणून ठेवलेल्या कॅश मार्जिन/कॅशन मनी/सुरक्षा ठेवींची रक्कम नेट-ऑफ करु शकतात.

**ताळेबंदाबाहेरील बाबी**

(२) ह्या निदेशांमध्ये, ताळेबंदाबाहेरील बाबींना दिलेल्या कर्ज ओखमींच्या मात्रा, क्रेडिट कनव्हर्शन फॅक्टरची टक्केवारी म्हणून व्यक्त करण्यात आल्या आहेत. ह्यासाठी, प्रत्येक बाबीच्या दर्शनी मूल्याला, ताळेबंदाबाहेरील बाबीचे क्रेडिट इक्विव्हॅलंट मूल्य काढण्यासाठी संबंधित कनव्हर्शन फॅक्टरने आधी गुणावे लागेल. संबंधित प्रतिपक्षांना लागु असलेल्या जोखीम भारांनी, प्रत्येक बाबीच्या क्रेडिट इक्विव्हॅलंट मूल्याला गुणावे लागेल. असे एकूण जोखीम भारित मूल्य, किमान कॅपिटल रेशो काढण्यासाठी विचारात घेतले जाईल. ताळेबंदाबाहेरील बाबींचे क्रेडिट इक्विव्हॅलंट मूल्य, खाली दिलेल्या निधी आधारित नसलेल्या बाबींसाठी असलेल्या क्रेडिट कनव्ह्र्शन फॅक्टरांनुसार काढले जाईल :

| **बाबीचे स्वरुप** | **क्रेडिट कनव्हर्शन फॅक्टर - टक्के** |
|---|---|
| i) वित्तीय व इतर हमी | १०० |
| ii) शेअर्स/डिबेंचर्स ह्यासारख्या आर/ओ गुंतवणुकीतील अंडर रायटिंग जबाबदाऱ्या, इ | ५० |

iii) अंतशः दिलेले शेअर्स/डिबेंचर्स १००

iv) केलेले परंतु अंमलबजावणी न झालेले लीज करार १००

v) इतर आकस्मिक जबाबदाऱ्या ५०

**टीपः** कनव्हर्शन फॅक्टर लागु करण्यापूर्वी कॅश मार्जिन्स/ठेवी वजा केल्या जातील.

**<u>मॉडगेज गॅरंटी कंपनीच्या स्वतःच्याच शेअर्स विरुध्द कर्ज देण्यास मनाई आहे</u>**

**१३.** (१) कोणतेही मॉडगेज गॅरंटी कंपनी तिच्या स्वतःच्याच शेअर्स विरुध्द कर्ज देणार नाही.

(२) स्वतःच्याच शेअर्स विरुध्द दिलेल्या कर्जाची थकबाकी, त्या मॉडगेज गंरंटी कंपनीद्वारा तिच्याकडून पंजीकरण प्रमाणपत्र दिले जाण्यापूर्वी, परतफेडी वेळापत्रकानुसार वसुल केली जाईल.

**<u>कर्ज/गुंतवणुकीची घनता</u>**

**१४.** (१) कोणतीही मॉडगेज गॅरंटी कंपनी पुढीलप्रमाणे असलेल्यांना कर्ज देणार नाही

(अ) एकाच कर्जदाराला, स्वतःच्या निजनिधीच्या १५ टक्क्यांपेक्षा अधिक; आणि

(ब) एकाच कर्जदार गटाला स्वतःच्या निजनिधीच्या २५ टक्क्यांपेक्षा अधिक; आणि

(२) प्रत्येक मॉडगेज गॅरंटी कंपनी एकच पक्ष/पक्षांचा एकच गट ह्यांच्या बाबतीत असलेल्या जोखमीसंबंधाने एक धोरण तयार करील.

**टीप :**

(१) मर्यादा ठरविण्यासाठी, ताळेबंदाबाहेरील जोखमींचे, वर सांगितल्यानुसार कनव्हर्शन फॅक्टर लावून, कर्ज जोखमींमध्ये रुपांतर केले जाईल.

(२) ह्या परिच्छेदात विहित केलेल्या हेतूंसाठी डिबेंचर्स मधील गुंतवणुकी, गुंतवणुकी न समजता कर्ज म्हणून समजला जातील.

(३) अशा मॉडगेज गॅरंटी कंपनीने तिच्या गटातील कंपन्या/संस्थांना तसेच कर्जदाराच्या कंपनी गटाला लागु असलेल्या कर्ज जोखमींना ह्या मर्यादा लागु असतील.

**पत्ता, संचालक, ऑडिटर्स, इत्यादि मधील झालेला बदल सादर केला जावा.**

**१५**. प्रत्येक मॉडगेज गॅरंटी कंपनी, पुढील बाबतीत झालेला बदल, तो बदल झाल्यापासून एक महिन्याच्या आत रिझर्व बॅंकेला कळवील :

(अ) पंजीकृत/कॉर्पोरेट ऑफीसचा संपूर्ण टपाल पत्ता, टेलिफोन आणि फॅक्स नंबर्स;
(ब) कंपनीच्या संचालकांची नावे व राहता पत्ता;
(क) मुख्य अधिकाऱ्यांची नावे व कार्यालयीन पद्नावे;
(ड) कंपनीच्या ऑडिटर्सची नावे व कार्यालयीन पत्ता; आणि
(ई) कंपनीच्या वतीने सही करण्यात प्राधिकृत असलेल्या अधिकाऱ्यांच्या नमुना - सह्या.

**<u>सूट</u>**

**१६.** त्रास टाळण्यासाठी तिला तसे आवश्यक वाटल्यास किंवा दुसऱ्या एखाद्या न्याय्य व पुरेशा कारणाने, रिझर्व बँक, तिने घातलेल्या अटींवर, कोणत्याही मॉडगेज गॅरंटी कंपनीला, किंवा मॉडगेज गॅरंटी कंपन्यांच्या वर्गाला, ह्या सर्व सूचनांमधील सर्व तरतुदी किंवा कोणत्याही तरतुदीचे पालन करण्यास मुदत वाढ किंवा सूट देऊ शकते.

**विवेचन/अर्थांतरण**

**१७**. ह्या निदेशातील तरउदींची अंमलबजावणी करण्यासाठी, रिझर्व बँक, तिला आवश्यक वाटल्यास, ह्यातील कोणत्याही बाबींसंबंधाने स्पष्टीकरण देऊ शकते आणि रिझर्व बँकेने दिलेल्या ह्या निदेशातील कोणत्याही तरतुदीचा अर्थ अंतिम व सर्व संबंधित पक्षांवर बंधनकारक राहील.

(पी. क्रिष्णमुर्थी)
प्रभारी मुख्य महाव्यवस्थापक